प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०३.०२.२०२१**

## खारघर येथील सेंट्रल पार्क उद्यान १० फेब्रुवारी २०२१ पासून होणार खुले

कोविड-१९ महासाथीच्या पार्श्वभूमिवर गेल्या ११ महिन्यांपासून बंद असलेले खारघर येथील सेंट्रल पार्क उद्यान १० फेब्रुवारी २०२१ पासून खुले करण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे. सेंट्रल पार्कमध्ये विरंगुळ्यासाठी तसेच व्यायामासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य नागरिकांना हा निर्णय सुखावणारा ठरणार आहे.

कोविड-१९ विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी २२ मार्च २०२० पासून केंद्र व राज्य शासनातर्फे टाळेबंदी लागू करण्यात आली होती. टाळेबंदी अंतर्गत उद्यानांसारखी सार्वजनिक ठिकाणेही बंद करण्याचे निर्देश दिले गेले असल्याने गेल्या सुमारे ११ महिन्यांपासून सेंट्रल पार्क उद्यानही नागरिकांकरिता बंद करण्यात आले होते. परंतु सद्यस्थितीत कोरोनाचा कमी होत असलेला संसर्ग आणि शासनाच्या अनलॉक (टाळेबंदी शिथिलीकरण) प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार सेंट्रल पार्क उद्यान खुले करण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे. सेंट्रल पार्कसारखे निसर्गसंपन्न, मनोरंजन, जॉगिंग इ. सोयी सुविधांनी युक्त असणारे उद्यान खुले होणार असल्याने खारघर परिसरातील नागरिकांना या निर्णयाचा निश्चितच फायदा होणार आहे. सेंट्रल पार्कमध्ये येणाऱ्या नागरिकांनी मास्क वापरणे, सामाजिक अंतराचे पालन करणे इ. कोविड-१९ सुरक्षाविषयक नियमांचे पालन करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**